# ग्रामपंचायत कार्यालय पोहरा

## पंचायत समिती लाखनी

ई - टेंडर नोटीस क्र. 1- 2026-2027

जा.क्र. Q ग्रा.पं. पोहरा./इ नि / 1 /2026. दि. 14/05/2026

**ग्रामपंचायत पोहरा ला सर्व योजनांच्या अंतर्गत विविध बांधकाम व इतर कामाकरिता साहीत्य पुरविणेबाबद.**

ग्रामपंचायत पोहरा ला, निविदा मंजुरीचे दिनांक ते 31/03/2027 पर्यंत चे कालावधी करीता सर्व योजनांच्या अंतर्गत विविध प्रकारचे बांधकामासाठी लागणारे साहीत्य पुरविण्याकरीता GST कायद्यान्वये पंजीकृत पुरवठा धारकांकडुन ई- निविदा मागविण्यात येत आहेत . सदर कामाची प्रक्रीया संगणकावर प्रक्रीयेव्दारे ऑनलाईन करण्यात येईल . या निविदेसंबंधीत यापुढील सर्व सुचना / शुद्धी-पत्रक ईत्यादी इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येईल .वरील निविदेबाबद संपुर्ण माहीती शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 14/05/2026 रोजी दुपारी 13.00 वाजेपासुन दिनांक 20/05/2026 ला दुपारी 12.00 वाजतापर्यंत पाहता येईल व डाऊनलोड करणे व निविदा भरता येईल.

**निविदा बाबद आवश्यक बाबी**

1) निविदा प्रपत्र डाऊनलोड फी रक्कम रू. 500/-अक्षरी (पाचशे रू.) व अमानत रक्कम 2000/-अक्षरी ( दोन हजार रु) ही NEFT/RTGS/ CASH द्वारे ग्रामपंचायत पोहरा चे खाते क्रं. 922010100001891, (BOI POHARA) IFSC CODE - BKID0009220 मध्ये जमा करावे व UTR क्रं. नोंदवून स्कॅन करून ती स्लीप ई-निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

2) सदर कामाचा आवश्यक अटी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इ.माहीती उपरोक्त संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत .

3) अ) सदर अटी शर्ती नुसार नमुद केलेल्या कागदपत्रांच्या व UTR क्रं. नोंदवून स्कॅन करून ती स्लीप ई- निविदेत स्कॅन करून पी.डी.एफ(PDF)फॉर्म मध्ये सादर करणे आवश्यक आहे.तसेच अपलोड केलेली सर्व कागदपत्रे पुर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरविली जाईल .

4)उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही .

5)पुर्ण माहिती भरलेले तांत्रीक लिफाफा क्र.1 ऑनलाईन पध्दतीने दि. 21/05/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ग्रामपंचायत कार्यालय पोहरा येथे उघडल्या जातील (शक्य झाल्यास) .

6)कोणत्याही निविदा अंशतः अथवा पुर्णतः स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याच्या अधिकार सरपंच व ग्रामपंचायत अधिकारीग्रा.पं. पोहरा यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सरपंच<br>ग्रामपंचायत पोहरा | ग्रामपंचायत अधिकारी<br>ग्रामपंचायत पोहरा |

# ग्रामपंचायत कार्यालय , पोहरा.

## पंचायत समिती लाखनी

**ग्रामपंचायत पोहरा ला सर्व योजनांच्या अंतर्गत विविध प्रकारचे बांधकामासाठी लागणारे साहित्य पुरवठा करणेबाबद.**

**निविदेच्या अटी व शर्ती**

1) निविदा प्रक्रिया ही ई-निविदा प्रक्रियेने करण्यात येणार असुन त्यामधील दस्ताऐवज अपलोड करून स्कॅन कॉपी ई-निविदा पध्दतीने सादर करण्यात यावी .

2) लिफाफा क्र.1 मध्ये निविदा सुचनेनुसार अपलोड केलेल्या व स्कॅन कॉपी डाऊनलोड करून खालील प्रमाणे दस्ताऐवज जोडण्यात यावे .

अ) अमानत रक्कम रू. 2000/- ही NEFT/RTGS द्वारे ग्रामपंचायत पोहरा चे खाते क्रं. 922010100001891, (BOI POHARA) IFSC CODE - BKID0009220 मध्ये जमा करावे व UTR क्रं. नोंदवून स्कॅन करून ती स्लीप ई-निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील

ब) GST कायद्यान्वये पंजीयन प्रमाणपत्र (अद्यावत नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र अनिवार्य आहे.)

क) पॅन कार्ड व मागील दोन वर्षाचे प्राप्तीकर भरल्याबाबत प्रमाणपत्र / दाखला जोडण्यात यावा.

ड) निविदा धारकाचे नाव शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबद सक्षम प्रधीकरणाकडुन साक्षांकित केलेला प्रतिज्ञालेख (Affidavit).

इ) निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पुरवठाधारकाच्या डिजीटल स्वाक्षरीने अर्जासोबत असलेली मुळ प्रत.

फ) तांत्रीक लिफाफा यामध्ये सादर करावयाच्या आवश्यक कागद पत्रासोबत आयकर भरल्या संबंधी किंवा त्यातुन सुट मिळाल्या संबधी सक्षम प्राधीकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

भ) सादर केलेल्या लिफाफा यामधील तांत्रीक लिफाफा यामध्ये ( क्र.1) नमुद केलेल्या आवश्यक अटी पैकी एकही बाब अपुर्ण असल्यास लिफाफा क्र.2 उघडल्या जाणार नाही.

3) पुरविण्यात येणाऱ्या सर्व साहीत्याची रॉयल्टी, आयकर, GST व शासनाने ईतर उपकर व फी भरण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील .व यातील कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठा धारक स्वतः जवाबदार राहील.

4) लिफाफा क्र.2 मध्ये सर्व साहीत्याचे दर (BOQ) हे GST व सर्व कारांसहीत एकत्रीतपणे नमुद करावे.

5) साहीत्याची मागणी केल्यापासुन तीन दिवसाच्या आत साहीत्य पुरवठा ग्रामपंचायत कार्यालय पोहरा येथे किंवा ग्रामपंचायत ने सुचविलेल्या बांधकाम स्थळी करावा लागेल. अन्यथा अनामत रक्कम जप्त करून निविदा रद्द केली जाईल.

6) लिफाफा क्र.2 मध्ये पुरवठा धारकाने स्वतःसाठी खरेदी केलेल्या निविदा अर्जात (प्राईस टेंडर फार्म) पुरवठा करावयाचे साहीत्याचे GST व सर्व करासहीत निविदेत दर्शविल्या प्रमाणे एकत्रीकरण दर दर्शविणे आवश्यक असुन पुरवठा धारकाने तो अपलोड करावा.

7) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाकरून डाऊनलोड केलेल्या निविदा फार्मवरच निविद सादर करणे आवश्यक आहे. तसेच बिना स्वाक्षरी असलेली निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

8) लिफाफा क्र.1 मध्ये जोडलेले आवश्यक कागदपत्रे व निविदामध्ये नमुद केलेले दर यांचे मुल्यमापण करूण निविदा स्विकृतीचे किंवा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकारी सरपंच / ग्रामपंचायत अधिकारीग्रा.पं. पोहरा यांना राखीव आहेत.

9) निविदा अर्जाची किमंत रू. 500/- ही NEFT/RTGS/CASH द्वारे ग्रामपंचायत पोहरा चे खाते क्रं. 922010100001891, (BOI POHARA) IFSC CODE - BKID0009220 मध्ये जमा करावे व UTR क्रं. नोंदवून स्कॅन करून ती स्लीप ई-निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.(नापरतावा )

10) कोऱ्या निविदा डाऊनलोड करण्याचा दिनांक 14/05/2026 ला दुपारी 13.00 ते 20/05/2026 ला दुपारी 12.00 वाजे पर्यंत.

11) निविदा उघडण्याची वेळ व तारीख 21/05/2026 ला दुपारी 12.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालय पोहरा (शक्य झाल्यास).

12) मंजुर निविदेतील साहीत्याचे दर दि. निविदा मंजुरीचे दिनांक ते 31/03/2027 पर्यंत लागु राहतील.

14) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

15) निविदा मंजुर झालेल्या पुरवठाधारकाला आदेशपत्र देण्यापुर्वी रू. 500/- च्या स्टॅम्पपेपरवर विहीत नमुण्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

16) पुरवठा धारकास पुरविलेल्या साहीत्याचे देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील. मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही.

17) सदर निविदेची प्रक्रिया वरील संकेत स्तळावर पार पाडली जाणार आहे. तरी कोणत्याही पुरवठादाराने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या ग्रामपंचायतशी संपर्क करून दबाव तंत्राचा वापर केल्यास पुढील प्रक्रीये साठी अपात्र केले जाईल.

18) सशर्त निविदा अस्वीकृतीस पात्र ठरतील . निविदेतील सर्व अटी व शर्ती पुरवठा धारकास बंधनकारक राहतील.

वरील दिलेल्या निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदा धारकाची डिजीटल स्वाक्षरी

| सरपंच | ग्रामपंचायत अधिकारी |
|---|---|
| ग्रामपंचायत पोहरा | ग्रामपंचायत पोहरा |

Signature Not Verified
Digitally signed by Narahari Sajan Baraskar
Date: 2026.05.14 13:58:37 IST
Location: Maharashtra-MH